# ''भारतातील ग्रामीण स्त्री जिवनाच्या बदलांचा अभ्यास''

डॉ. नरसाळे दत्तात्राय वसंतराव
(भुगोल विभाग)
आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा
ता. आश्टी जि. बीड

**सारांशः**

''एखादया राश्ट्राकडून स्त्रीला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकिय महत्वावरुन त्या राश्ट्राची सांस्कृतीक उंची मोजता येते.'' भारत विकसनषिल कृशीप्रधान देष आहे. देषातील 78 टक्के जनता ग्रामीण भागात राहते. त्यामुळे ग्रामीण भागातील स्त्री षिक्षणाच्या विकासाची गरज देषाला जास्त आहे. अन्यथा देषाच्या लोकसंख्येपैकी अर्ध्याहुन अधिक हिस्सा अषिक्षित राहिल आणि राश्ट्र विकासात त्यांचा अडसर निर्माण होईल.




**प्रस्तावनाः**

जीच्या हाती पाळण्याची दोरी। ती जगाला उदधारी।

महाराश्ट्राच्या ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या जिवनाचा अभ्यास पाहिला असता तर किती खडतर आणि कश्टाळू जिवन जगणाऱ्या आपला स्त्रीला आपणास दिसतात. ग्रामीण भागातील स्त्रीयाचे प्रष्न आजही सुटले आहेत असे नाही. परंतू पूर्वीपेक्षा किती तरी परिस्थीती बदलत गेलेली आहे. गावातील स्त्री जिवनातील दरी कमी करणे ही आज काळाची गरज आहे. महिला चळवळीच्या कार्याचा आढावा घेताना असे दिसते. जे काही संघर्श आणि लढे झाले ते षहरी भागातून झाले. त्यामुळे त्या लढयाचा परिणाम ग्रामीण भागावर फारसा झाला नाही. हे लढे षहरापूरतेच मर्यादीत राहिले.

स्त्री अभ्यास ही एक नगन्य घडत असलेली आंतरषाखीय स्वरुपाचा आषय विकसीत करु पाहणारी अषी ज्ञान षाखा आहे. स्त्रीवादी दृश्टीकोणातून समाजाचा राजकिय, आर्थिक, सामाजिक इतिहासाचा अभ्यास केला जातो आणि त्यात लिंग भाव, वर्ण, वर्ग, जात, लैंगिकता आणि इतर सामाजिक विशमताची स्त्रीवादी चिकित्सा केली जाते.

**ग्रामीण महिलांच्या समस्याः**


ग्रामीण भागात खुरपणी ( निदनी ) करताना स्त्रीया


पाठोपाठ मुले होण्यामुळे स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते.

5000 वर्शापासूनचा इतिहास आहे पुरुशांना स्त्री पेक्षा श्रेश्ठ ठरवून त्यांना अनेक हक्क देण्यात आले तेव्हापासून स्त्रींना मात्र कनिश्ठ ठरवून हक्कापासून वंचित ठेवण्यात आले व त्याचा परिणाम म्हणजे स्त्रीयांवरील होणारे अत्याचार वाढले. कुटूंबप्रमुख म्हणून पुरुशांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. घरातील कर्ता पुरुश हा कुटुंब प्रमुख असतो. कुटुंबव्यवस्थेत स्त्रीला नगण्य स्थान आहे. मुलांचा जन्म झाल्र्यावर जितका आनंद होतो तितका आनंद मुलीच्या जन्माने होत नाही. काही कुटुंबात तर मुलगी झाल्यास चिंतेचे वातावरण निर्माण होते. 1901 साली तर 927 पर्यत घसरले हे घटते प्रमाण ही देषापुढील एक महत्वाची समस्या बनली आहे.

2011 च्या जनगणनेनुसार पुरुशांच्या षिक्षणाचे प्रमाण 82 टक्के असून स्त्रीयांच्या षिक्षणाचे प्रमाण 65 टक्के इतके आहे. भारतामध्ये हुंडा पध्दत अस्तित्वात आहे. प्रत्येक प्रांतात जातीत. धर्मामध्ये सुध्दा हुंडा पध्दत अस्तित्वात आहे. यामुळे वैवाहिक जिवनात एका भयानक समस्येस स्त्रीला तोंड दयावे लागते.

लैंगिक अत्याचार, अनैसर्गिक संभोग करणे, अष्लील फोटो काढणे, जबरदस्ती करणे या घटना स्त्री बाबत घडत असतात. अषा अनेक प्रकारानी भारतीय समाजातील स्त्रीया कौटुंबीक आणि सामाजिक अत्यांचाराना बळी ठरत असते. उपाययोजना राबवता येतील.

**कायदेषिर उपाय योजनाः**

1- 2005 पासून कौटुंबिक हिसांचारापासून महिलाचे संरक्षण अधिनियम कायदा 26/10/2006 पासून लागू करण्यात आला. या कायदयाते एक वर्शाची कैद आणि 20000 रुपये दंड होऊ षकतो.

2- कलम 498 (अ) नुसार हुंडा किंवा अन्य हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली जाते.

3- महिला संघटनाची स्थापना करुन स्त्री षक्तीकडून पिडीत महिलांना मदत करण्यात येते.

4- हुंडा प्रतिबंध कायदा 5 वर्शे कैद व 15000 रुपये दंड ही षिक्षा होऊ षकते.

5- कलम 306 नुसार पती किंवा नातेवाईकांनी छळ करणे गुन्हा ठरतो.

6- ॲक्ट 1956 नुसार स्त्रीला कुटुंबाच्या मालमत्तेत वाटा देण्यात आला आहे.

7- ॲक्ट 1955–56 नुसार बालविवाहास बंदी व पुनर्विवाह करता येतो.

**महाराश्ट्रातील स्त्रीवर झालेले अत्याचार (2010 ते 2013)**

| अत्याचार | 2010 | 2011 | 2012 | 2013 |
|---|---|---|---|---|
| हुंडाबळी | 131 | 134 | 107 | 329 |
| कौंटुबिक छळ | 7434 | 7136 | 7415 | 7451 |
| बलात्कार | 1599 | 1701 | 1839 | 1140 |
| विनयभंग | 3661 | 3794 | 3935 | 3935 |
| अपहरण | 1124 | 1252 | 1440 | 329 |
| लैंगिक अत्याचार | 1180 | 1071 | 1294 | 1290 |

**बदलती स्त्रीः (महिलाच्या संघटीत षक्तीचा प्रयत्न)**

षेतीवर कश्टाचे कामे करणे, षेळी पालन, कोंबडी पालन, दुग्ध व्यावसायात गायी म्हसीची व्यवस्था पाहणे ही कामे पूर्वीपासून स्त्रीया करीत आहेत. नेहमीच स्त्रीयांना पुरुशापेक्षा कमी मजूरी मिळते. काळाच्या ओघात ही परिस्थीती बदलाचे अनेक प्रयत्न झाले. त्यात ग्रामीण स्त्रीचा महत्वाचा वाटा आहे. त्या काही घटनाचा मागोवा.




**महाराष्ट्रातील संघटीत होत जाणारी स्त्रीः**

1972 ते 1974 च्या भीशण दुश्काळातच झाली. त्यावेळी ग्रामीण भागातील स्त्रीयानी मोर्चे काढुन रोजगार हमीयोजना षासनाला हाती घेण्यास भाग पाडले. 1986 मध्ये षेतकरी संघटने तर्फे षरद जोषींच्या नेतृत्वाखाली चांदबंड येथे दोन दिवसाचे महिला षिबीर घेण्यात आले. त्यात एक लाख स्त्रीयांनी सहभाग नोंदवला. 1990 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रथमच स्त्रियांना 30 टक्के आरक्षण देण्यात आले. 1993 मध्ये 33 टक्के आणि 2009 मध्ये 50 टक्के राखीव जागा मिळाल्या त्यामुळे तळागाळातल्या स्त्रीयांना गावच्या व्यवस्थेत काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे 14 लाख स्त्रीया

प्रवाहात आले आहेत. त्यामुळे नगरपरिशद, जिल्हा परिशद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, मार्केट कमिटी मध्ये पदावर येवून खुर्चीवर बसू लागले. स्त्रीच्या आर्थिक परिस्थीतीत सुधारणा झाली. बदलत्या काळात बचत गट, स्त्री षेतकरी गट याच्या स्थापना करुन मुख्य प्रवाहात येत आहे. बचत गटानंतर मोठी बाजारपेठ काबीज केली आहे. स्त्री संघटनानी मोठी चळवळ उभारुन स्त्रीयांना निर्भय बनवले.

- अल्पवयातील लग्नाचे प्रमाण घटले.
- मुलीच्या षिक्षणातील प्रमाण वाढले.
- महिला अधिक सबलीकरण
- स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक योजना राबवण्यास षासनास भाग पाडले.
- राजकिय क्षेत्रात, अनेक स्त्रीया उच्च पदापर्यंत गेलेल्या दिसतात.
- सामाजिक, आर्थिक क्रिडा, साहित्य, क्षेत्रामध्ये भारतीय स्त्रीयानी आपले कार्याचा ठसा उमठवला आहे. एकदरीत सर्वच क्षेत्रामध्ये महिला वाढता सहभाग वाढत आहे.




**संदर्भः**


1. महिला सबलीकरण – डॉ. संभाजी देसाई
2. ग्रामीण महिलाच्या मुलभूत समस्या आणि उपाय – डॉ. सय्यद तब्बसूम सुलतान
3. महिला बचतगट – संजयबाबा घाडगे
4. स्त्री प्रष्नांची वाटचाल परिवर्तनाच्या दिषेने प्रतिमा प्रकाषन, पुणे